# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाविद्यालयाचे नांव :- **कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.)**

## -:: राष्ट्रीय सेवा योजना विभाग नियमित कार्य वार्षिक अहवाल ::-

## शै.वर्षे २०१७-१८

राष्ट्रीय सेवा योजना विभागात २०० विद्यार्थ्यांनी आपली नांव नोंदणी केली.

दि.२१ जुन २०१७ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला योगशिक्षक प्रा.संदिप संपाळ यांनी योगाचे धडेदिले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक - शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.०१ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांची जयंती व आण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रा.रमेश लांडगे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने होत्या तर कार्यक्रमाचे प्रस्तावीक कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी केले. सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी प्रा.उध्दव चौधर यांनी केले आभार प्रा.विठ्ठल जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कर्मचारी यांच्या बरोबर विद्यार्थी विद्यार्थीनी मोठया प्रमाणात उपस्थित होते. या वेळी अल्पोपहार देण्यात आला.

दि.१५ ऑगस्ट २०१७ हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यात आला. या वेळी प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.२५.०८.२०१७ रोजी ऊसतोड मजुर आत्महत्याग्रस्थ शेतकरी यांचीमुले ज्या शांतीवन आर्वी येथे निवाशी शिक्षण घेतात तेथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले, परिसर स्वच्छता करून तेथील मुलांची मनोगत ऐकली व स्वच्छतेचा संदेश दिला.

**पान २ वर...**

D/Ashok more/Pag./Gholve Sir...(66)

Scanned by CamScanner

कालिकादेवी महाविद्यालयात जागतीक जंतनाश्क दिनाचे औचित्य साधुन ग्रहशास्त्र, अरोग्य विभाग व रा.से.यो. विभागाच्या वतिने शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळयांचे वाटप करण्यात आले.

दि.२३ ऑगस्ट हा दिन विभागाच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापण दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहन करून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा.विठ्ठल जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला या कार्यक्रमाला विद्यार्थी विद्यार्थीनीं मोठया संख्येने उपस्थित होते.

विभागाच्या वतिने आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन शिरूर गांवात साक्षरता दिंडीकाढून साजरा करण्यात अला.

दि.०५ सप्टेंबर हा दिवस सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.

रा.से.यो.विभागा तर्फे दि.१७ सप्टेंबर २०१७ हा दिवस मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

कालिकादेवी महाविद्यालयात २४ सप्टेंबर २०१७ हा दिवस रा.से.यो. दिन वृक्षारोपन करून साजरा करण्यात आला.

शिष्यवृत्तीवर एक दिवसीय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ सेंटर सेक्टर, भारत सरकार शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती (मायनॉरीटी) एकलव्य इ. व्या विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचा लाभ झाला. महाविद्यालयातील मोठया प्रमाणात विद्यार्थी - विद्यार्थीनी स्वयंसेवक उपस्थित होते.

दि.०२ आक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी यांची जयंती जागतिक आंहिंसा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थी - विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.०४ आक्टोंबर २०१७ हा दिवस आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापीका मा.खा.केशरबाई क्षीरसागर यांची पुण्यतिथी विभागाच्या वतिने साजरी करण्यात आली. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी, मोठया संख्येने उपस्थित होते.



पान ३ वर...

Scanned by CamScanner

दि.०७ आक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयात प्रा.सौ.विजया मारोतकर यांचे व्याख्यान स्त्री अत्याचारा विरोधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'पोरी जरा जपुण' या कार्यक्रमातुन विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांना उपदेश केला.

विभागाच्या वतिने संविधान दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. संविधान जागृतीक जीवनमुल्य जोपासली असे अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने म्हणाल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.अशोक घोळवे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.विठ्ठल जाधव यांनी केले तर अभार प्रा.उध्दव चौधर यांनी मानले.

दि.०१ डिसेंबर २०१७ हा जागतीक एड्स दिन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लबच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. डॉ.सुहास खाडे यांनी मार्गदर्शन केले.

दि.०६ डिसेंबर २०१७ हा दिवस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाह दिन साजरा करण्यात आला.

दि.१२ डिसेंबर २०१७ रोजी आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.आ.जयदत्त (आण्णा) क्षीरसागर यांचा वाढदिवस विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी १२४ विद्यार्थ्यांच्य रक्तातील हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबीराचे उद्घाटन डॉ.सुहास खाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम या कार्यक्रमात स्वयंसेवकांनी महत्वपुर्ण भूमिका बजावली.

राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक संजय प्रभाकर ढाकणे याची भारत सरकार युवा कार्य मंत्रालय एवं खेल मंत्रालय नवी दिल्ली आयोजित राष्ट्रीय युवक महोत्सव, राष्ट्रीय युवा सामान्य व सुविचार शिबीर गाजीयाबाद नॉयडा येथे दि.१२.०१.२०१७ ते दि.१६.०१.२०१७ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या शिबीरासाठी महाविद्यालयातून जिल्हयाचे प्रतिनिधीत्व संजय प्रभाकर ढाकणे या विद्यार्थ्याने केले.

स्वच्छता मित्र तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवला. भाग्यश्री जाधव, आक्षय यादव व प्रतिक्षा चव्हाण हे विद्यार्थी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषकाचे मानकरी ठरले.

*पान ४ वर...*



Scanned by CamScanner

महाविद्यालयात स्वर्गीय केशरबाई क्षीरसागर आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या आयोजनात रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यात द्वितीय क्रमांक भाग्यश्री जाधव व तृतीय क्रमांक कु.प्रतीक्षा चव्हाण या विद्यार्थीनीने पटकावला.

दि.१२ जानेवारी २०१७ रोजी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विभागाच्या वतिने साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थी - विद्यार्थीनी स्वयंसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दि.१४ जानेवारी या दिवशी महाविद्यालयात विभागाच्या वतिने तिळगुळ कार्यक्रम व विद्यापीठ नामविस्तार दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने यांनी मार्गदर्शन केले. स्वयंसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

या शैक्षणिक वर्षात विविध अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, दिन, सप्ताह, पंधरवाडा, वृक्षारोपण, जयंत्या, पुण्यतिथ्या मोठया प्रमाणात साजऱ्या करण्यात आल्या. वेगवेगळया कार्यक्रमास विद्यार्थी - विद्यार्थीनी बरोबर ग्रामस्थ, पंचक्रोशितील ग्रामस्थ अधिकारी, पदाधिकारी, महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व प्राद्यापक, प्राद्यापीका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेऊन प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहभाग नोंदवला, भाग घेतला, प्रोत्साहन दिले. त्या सर्वांबद्दल राष्ट्रीय सेवायोजना विभाग सस्नेह आभारी आहे. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक डॉ.टी.आर. पाटील, जिल्हा समन्वयक डॉ.सोपान सुरवसे डॉ.प्रेमलता घाडसिंग, प्रा.डॉ.उमेश मुंडे यांचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाला सहकार्य लाभले त्या बद्दल त्यांचेही कृतज्ञतापूर्वक आभार.

**कार्यक्रमाधिकारी**
**(रा.से.यो.)**

Principal
Kalikadevi Arts, Comm. & Sci. College,
Shirur (Ka.), Dist. Beed

Scanned by CamScanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाविद्यालयाचे नांव :- **कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.)**

## :: राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष शिबीराचा कार्य अहवाल ::

***दि. १८/०१/२०१८ ते दि.२५/०१/२०१८***

कालिकादेवी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर दत्तक गांव मौजे पाडळी या गावात संपन्न झाले. शिबीराचे तीसरे वर्षे आहे. या गांवात रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी विविध समाजउपयोगी कामे केली. संपूर्ण ग्राम सफाई केली. त्यात नाल्या काढणे, रहदारीचा रस्ता, चौक परिसर स्वच्छकरणे मंदिर, बौध्दविहार यांची स्वच्छता व सुशोभिकरण करणे, पाणंदमुक्ती, शाळेच्या विद्यार्थ्यांना हात धुन्याचे प्रशिक्षण दिले. शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थीनींचे नखं कापली. स्वच्छतेचे महत्व स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

वयोवृध्द महिला व वयोवृध्द पुरूष यांची वाढलेली नखं स्वयंसेवकांनी काढली.

दि.१९ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ग्रामस्वच्छता आटोपुन स्वयंसेवकांनी विशेष शिबीराच्या उद्‌घाटणाची तयारी केली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली शिरूर (का) तहसीलदार तथा दंडाधिकारी श्री.बालाजी शेवाळे यांच्या हस्ते या शिबीराचे उद्‌घाटण करण्यात आले.

यावेळी गावांचे सरपंच रामदास हंगे उपसरपंच गहिनीनाथ पाखरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, प्रा.उध्दव चौधर सामाजिक कार्यकर्ते माऊली सिरसाठ, अप्पा येवले यांच्यासह प्राध्यापक शिक्षकेवर कर्मचारी स्वयंसेवक ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

5/3/18

पान २ वर...



Scanned by CamScanner

दि.२०/०१/२०१८ प्रा.विठ्ठल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवायोजनेत युवकांची भूमिका या विषयावर प्रा.भांडवलकर बी.एन. व प्रा.एस.व्ही. मोरे यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन अक्षय यादव यांनी केले. तर आभार सोनाली सरवदे हिने मानले कार्यक्रमाला ग्रामस्थ स्वयंसेवक मोठयासंख्येने उपस्थित होते.

दि.२१.०१.२०१८ रोजी मातीपरीक्षण काळाची गरज या विषयावर अर्जुन चव्हाण (कृषी पर्यवेक्षक, शिरूर) व विजय राठोड (यांनी मार्गदर्शन केले.)

दि.२२.०१.२०१८ रोजी डॉ.सुषमा सानप डॉ.प्रियंका जवरे, डॉ.प्रिती बडे, प्रा.सय्यद ए.ए. यांचे तारूण्यातील अरोग्य या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्ष डॉ.शामा लोमटे या होत्या तर सुत्रसंचलन कु.काजल कानडे तर आभार कु.मंगल लांडगे या स्वयंसेविकेने केले.

दि.२३.०१.२०१८ रोजी प्रा.आर.टी.गर्जे व प्राचार्य डी.एस.कुलकर्णी यांनी ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्वयंसेवक सोनाली सरवदे हिने केले तर आभार कु.मोनीका गाडेकर हिने मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठया प्रमाणात उपस्थित होते.

बुधवार दि.२४.०१.२०१८ रोजी डॉ.म.व. क्षीरसागर व प्रा.अशोक डोंगरे यांनी स्वच्छता व पर्यावरण यातील संताची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.पवार बी.टी.हे होते.

दि.२३.०१.२०१८ रोजी ४ ते ५ या वेळेत अनंतकराड, विठ्ठल जाधव, विजयकुमार गाडेकर, सतिश मुरकुटे, अप्पासाहेब तांबे, भगवान फुंदे, गोकुळ पवार भारत पानसंबळ, रा.ज.कातखडे, नवनाथ सानप, सिध्दार्थ सोनवणे इ. निमंत्रीत कवीचे कवी संमेलन झाले. अध्यक्ष प्रा.नवनाथ पवळे होते.

**सर्वेक्षण :-**

१. या प्रसंगी स्थानिक महिला नेतृत्वाचा सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा अभ्यास :- डॉ.सुधीर येवले यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो.च्या स्वयंसेकांनी पाडळी गावाचे सर्वेक्षण केले.

***पान ३ वर...***



Scanned by CamScanner

२. 'कृषी पीक लागवड सर्वेक्षण' डॉ.पी.एन.घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

३. **महिला व बाल आरोग्य सर्वेक्षण - डॉ.सी.व्ही.डोंगळीकर**

४. **शेतकऱ्यांचे आर्थिक सर्वेक्षण - डॉ.पंडित मुळे**

५. लोकसंख्या सर्वेक्षण - मार्गदर्शक - प्रा.संजय सावते.

इत्यादिच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी वेगवेगळया विषयावर सर्वेक्षण केले.

**समारोप :-**

आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ.राजेश मचाले प्राचार्य एम.ए. राऊत, व्ही.एल.क्षीरसागर प्रमुख उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते शांतीवन आर्वी चे संचचालक श्री.दिपक नागरगोजे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने यांच्या अध्यक्ष ते खाली पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा.उध्दव चौधर तर आभार प्रा.संजय सावते यांनी मानले या कार्यक्रमास ग्रामस्थ स्वयंसेवक मोठया संख्येत उपस्थित होते.

**कार्यक्रमाधिकारी**
**(रा.से.यो.)**

प्राचार्य
Principal
Kalikadevi Arts, Comm. & Sci. College,
Shirur (Ka.), Dist. Beed

Scanned by CamScanner